# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २७/०४/२०२४ (शनिवार) सायंकाळ**

---

## शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीस नागपूर ग्रामीण पोलीसांनी केले अटक

पोस्टे कोंढाळी अंतर्गत मौजा चाकडोह शिवार येथे दिनांक २६/०४/२०२४ रोजी फिर्यादी नामे— योगेश नामदेव काळे, वय ३९ वर्ष, रा. छत्रपती संभाजीनगर हे महाराष्ट्र परविहन विभागात सरकारी सेवेत रूजु असुन बस कंडक्टर म्हणुन काम करतात. फिर्यादी हे सकाळी ०८/०० वा. ते २०/०० वा. पर्यंत आपले डयुटीवर असतांनी नागपुर बसस्टॉप वरून छत्रपती संभाजीनगर येथे जाण्याकरीता आपली बससह निघाले असता यातील **आरोपी प्रवाशी नामे— फिरोज शेख नुर शेख, वय ३६ वर्ष रा. कान्होलीबारा ता. हिंगणा** याला बस टीकीट काढायला लावले असता कशाचे टीकीट व कशाचे पैसे असे म्हणुन फिर्यादीला शिवीगाळ करून हातभुक्याने मारहान केली व आपले हातातील कडयाने फिर्यादीचे डोक्याला व पाठीवर मारून जखमी केले. फिर्यादी आपले शासकीय काम करत असतांना त्यामध्ये अडथळा निर्माण केला. सदर आरोपीस कोंढाळी पोलीसांनी अटक केली आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक शेख हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कोंढाळी येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक राजकुमार त्रिपाठी, सफौ राजकुमार कोल्हे, प्रशांत निंबुळकर, अमित पवार यांनी पार पाडली.

## कुही येथील शाळेमध्ये जनजागृतीपर कार्यक्रम राबवून विद्यार्थ्यांना केले मार्गदर्शन

आज दि. २७/०४/२०२४ रोजी पोलीस स्टेशन कुही अंतर्गत मांढळ येथील विक्रम पब्लिक स्कूल मांढळ व कुही येथील अवधूत पॉलिटेक्निक व फार्मा कॉलेज तसेच मांढळ येथील MM patil Raut school मांढळ येथे भेट देवून विद्यार्थ्यांना मा. परि सहा. पोलीस अधिक्षक दिपक अग्रवाल IPS प्रभारी ठाणेदार कुही यांनी मार्गदर्शन केले त्यामध्ये विद्यार्थ्यांना वाहतूक नियमा बाबत त्या अंतर्गत हेल्मेट सक्तीने वापरावे, विनापरवाना कोणीही वाहन चालवणार नाही, सायबर क्राईम, दारू धूम्रपान, लैंगिक अत्याचार क्राईम बाबत जागरूकता स्पर्धापरीक्षा करिता मोलाचे मार्गदर्शन केले व सर्व नियमांचे काटेकोर पालन करणे इत्यादी सुचना दिल्या.







पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर